## निशाणी क्र. ५९ वरील आदेश

प्रतिवादी क्र. २ याने सदरचा अर्ज त्याचेविरूध्द् झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून त्याची कैफियत स्वीकारणेसाठी दाखल केला आहे. त्याचे म्हणण्यानुसार, वरील दाव्याचे कामी त्याचे विरूध्द दि. २५/०३/२०१९ रोजी एकतर्फा आदेश झालेला आहे. या कामी त्यांना कायदेशीर प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने पहिल्या तारखेस हजर होता आले नाही. तसेच ते ७१ वर्षाचा ज्येष्ठ नागरीक असल्याने वयोमानानुसार ते आजारी असल्याने त्यांना न्यायालयात उपस्थित राहून त्यांची कैफियत व नि. क्र. ५ वर म्हणणे देता आले नाही. तरी या कामी नि. क्र. ५ वर म्हणणे व दाव्यावर कैफियत देणची आहे. त्यामुळे दाव्यातील मिळकतीबाबतची सत्यपरिस्थीती न्यायालयाच्या निदर्शनास येण्यास मदत होणारी आहे. सबब त्यांचे विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेत येवून त्यांची कैफियत स्वीकारणेत यावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदरचा अर्ज हा प्रस्तूत प्रतिवादीने उशिराने दाखल केला आहे. सर्व बाबींचा विचार करून न्यायाच्या दृष्टीने योग्य तो आदेश पारीत करणेत यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादी क्र. २ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा वाटप व मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची

बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संध ी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत त्यांनी वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे:

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ यांनी रूपये ८००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रूपये ४००/— वादीस दयावेत व उर्वरित रक्कम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्गला जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : १४/०१/२०२०

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2020.01.15 10:50:59 +0530